प्रेस नोट

## परभणी शहर येथे आर्थिक फसवणूकीतून झालेल्या निर्घुन खूनाच्या गुन्ह्यातील ४ फरारी आरोपींना संघटित गुन्हेगारी विरोधी पथक, उत्तर प्रा.वि. गुन्हे शाखा पुणे कडून अटक

दि. ३०/०७/२०१७ रोजी अतिरिक्त पोलीस अधिक्षक श्री. विश्वास पानसरे सो., व स्थानिक गुन्हे शाखा जि. परभणीचे पोनि हिबारे यांनी फोनव्दारे पोलीस उप आयुक्त गुन्हे पुणे शहर श्री. पंकज डाहणे सो. यांना कळविले की, नानालपेठ पो.स्टे. परभणी जिल्हा गु.र.नं. १७९/२०१७ भादवि कलम ३०२, २०१, १४३, १४७, १४८, १४९, ३४२, ५०६, ३४ मधील निष्पण व पाहिजे आरोपी हे उण्ड्री, कोंढवा या परिसरात लपुन राहत आहेत. तरी आपले पथक पाठवुन त्यांना शोधुन ताब्यात घेण्यात यावे, म्हणुन सदर बाबत मा. पोलीस उप आयुक्त सो. गुन्हे, सहा पो आयुक्त गुन्हे-२ यांनी वरील माहितीचा आशय पोनि ब्रम्हानंद नाईकवाडी यांना कळविला असता, त्यांनी त्यांचे नमुद स्टाफसह मिळालेल्या आदेशा वरुन उण्ड्री व कोंढवा या परिसरात त्यांनी त्यांचे बरोबरील स्टाफ पोहवा/३२८७ भुजबळ, पोहवा/४०२८ देशमुख, पोना/३०४२ मेंगे, पोना/३७३२ गाडे, पोशि/७४५१ फुलसुंदर यांचेसह सदर भागात बातमीदारा मार्फत शोध घेऊन सदरचे आरोपींना फ्लॅट नं. १२, बिल्डींग नं. बी २, अतुरनगर सोसायटी, उण्ड्री पिसोळी, ता. हवेली, जि. पुणे या ठिकाण आरोपी नामे १) दिपक बापुराव बारहाते वय ३० वर्षे, रा. बारहाते गल्ली, मानवत, ता. मानवत, जि. परभणी. २) व्यंकटेश मुजांजीराव शिंदे, वय ३२ वर्षे, रा. खंडोबा बाजार, धार रोड, परभणी, ता. जि.परभणी. ३) हाजु ऊर्फ शेख हाजी शेख मोहम्मद हुसेन वय ३२ वर्षे, रा. खंडोबा बाजार, धार रोड, परभणी, ता.जि. परभणी. ४) बंटी ऊर्फ आकाश अभिमन्यु शिंदे वय २७ वर्षे, रा. बिल्डींग नं. बी २, फ्लॅट नं. १२, अतुरनगर, उण्ड्री पिसोळी, ता. हवेली, जि. पुणे. मुळ पत्ता रा. नरसिंह कॉलनी, कोर्टा मागे, पाथरी ता. पाथरी, जि. परभणी असे संशयीतरित्या मिळुन आल्याने त्या इसमांकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी सांगितले की, मयत नागनाथ हा पोरवाल जिनींगचे मालक प्रकाश पोरवाल व इतरांना त्यांच्या जिनींग मध्ये कापसाचे मुळ वजन न दाखवता कमी वजन दाखवून प्रकाश पोरवाल यांचा विश्वासघात करुन अर्थिक नुकसान केलेच्या कारणावरुन मयत इसम नामे नागनाथ मदनराव लेंगुळे वय २७ वर्षे रा. धनगर गल्ली, मानवत, ता. मानवत, जि. परभणी यास खंडोबा बाजार, परभणी येथे सुमारे २ महिन्या पूर्वी मारहाण करुन खून केला. यातील आरोपी नामे दिपक बारहाते याची पत्नी हया मानवत जि. परभणी येथिल नगरपालिकेच्या विद्यमान नगरसेविका आहेत.

सदरची कारवाई ही मा. पोलीस उप आयुक्त सो. गुन्हे श्री. पंकज डाहणे व सहा पोलीस आयुक्त सो. श्री. संजय निकम सो. गुन्हे २, पोलीस निरीक्षक ब्रम्हानंद नाईकवाडी, सहा पोनि गणेश पवार, पोउप निरीक्षक पी. डी. गायकवाड तसेच स्टाफ पोहवा/३२८७ दिपक भुजबळ, पोहवा/४०२८ राजनारायण देशमुख, पोना/३०४२ आतुल मेंगे, पोना/३७३२ तानाजी गाडे, पोशि/७४५१ दत्तात्रय फुलसुंदर यांनी केलेली आहे.